**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ५८१/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.युवराज परशराम ठाकरे
कार्यालय ज्ञानदा प्रकाशन , तहसिल कार्यालया वाडा जवळ
ता.वाडा, जि.पालघर

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल
वनपरिक्षेत्र कार्यालय कल्याण, महात्मा फुले चौक,
मुरबाड रोड, कल्याण , जि.ठाणे ४२१ ३०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल
वनपरिक्षेत्र कार्यालय कल्याण, महात्मा फुले चौक,
मुरबाड रोड, कल्याण , जि.ठाणे ४२१ ३०१

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ३/७/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ५/७/२०२१ | ---- | २०/८/२०२१ | ११/११/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " अपूर्ण माहिती दिली " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३/७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.निलेश श्यामसुंदर आखाडे, वनक्षेत्रपाल कल्याण यांचे प्रतिनिधी श्री.बी.आर.बनपट्टे, वनपाल उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *वनपरिक्षेत्र अधिकारी, कल्याण ता.कल्याण अंतर्गत झालेल्या विविध कामांची, उपलब्ध निधीची व खर्चाची माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.११/११/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*अर्जदार यांनी विचारणा केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल कल्याण यांनी १० दिवसात अपिलकार यांना पुरविण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.२६/७/२०२१ च्या पत्राव्दारे माहिती दिलेली आहे. त्यानंतर प्रथम अपील आदेशांनतर दि.१७/११/२०२१ च्या पत्राव्दारे तक्रारकर्ता यांना कळविले की, परिपूर्ण माहिती आपणास देणेकामी आपण कार्यालयात उपस्थित रहावे. तथापि त्यांनी कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्राप्त करून घेतली नाही.

तक्रारकर्ता यांना सुनावणी सूचना प्राप्त होऊन देखील ते सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही. उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते की, तक्रारकर्ता यांना माहिती दिली आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जुलै, २०२५ .

Comp-3